## युनिट १

# अर्थशास्त्राचा परिचय

- अर्थशास्त्राचा परिचय ( Introduction to Economics)
- अर्थशास्त्राची व्याप्ती (Scope of Economics)
- अर्थशास्त्राचे प्रकार (Types of Economics)

Department of Economics
BLD Arts College Pinjar

**प्रश्न १. अर्थशास्त्राबाबतचा प्राचीन दृष्टीकोन स्पष्ट करा.**

**उत्तर-** अर्थशास्त्र हे एक समाजिक शास्त्र असून त्यामध्ये मानवाच्या आर्थिक व्यवहारांचा अभ्यास केला जातो. मानवी जीवनात पैसा किंवा संपत्तीला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टिकोनातून अर्थ म्हणजे पैसा किंवा संपत्ती आणि अर्थशास्त्र म्हणजे पैशाचा अभ्यास करणारे शास्त्र असा केला जातो. अर्थशास्त्र हे गृहप्रबंधन किंवा कुटुंब पालनाचे शास्त्र आहे असे मानल्या जाते. अर्थशास्त्राचा विकास कसा होत गेला हे पाहण्याकरिता आपल्याला अर्थशास्त्रासंबंधीचा प्राचीन दृष्टिकोन आणि आधुनिक दृष्टिकोन महत्वपूर्ण ठरतात.

आज शास्त्रशुध्द स्वरुपात अर्थशास्त्र विषयाचा विकास झालेला असता तरी या विषयाचा इतिहास प्राचीन आहे. प्राचीन काळात अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा नव्हता तर अर्थशास्त्राला राजनीती, मानसशास्त्र, गृहप्रबंधन, तत्त्वज्ञान, नितिशास्त्र इत्यादी शास्त्राचा एक भाग समजले जायचे.

प्राचीन भारतातील इ.स. पूर्व चौथ्या शतकातील भारतीय विचारवंत कौटिल्य यांनी 'अर्थशास्त्र' नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी राजनीती, शिक्षण, न्यायव्यवस्था, संरक्षण, राजाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या, तत्त्वज्ञान व अर्थनिती याविषयी सखोल विवेचन केले. त्यांच्या मते 'प्रजेची उपजीविका व्हावी म्हणून राजाने नवीन प्रदेश कसा जिंकावा व आपल्या ताब्यात ठेवावा हे ज्या शास्त्रात सांगितले जाते त्याला अर्थशास्त्र असे म्हणतात.'

आचार्य चाणक्य यांनी आपल्या ग्रंथात अर्थशास्त्राला राजकीय अर्थशास्त्र म्हणूनच संबोधलेले दिसून येते. या शास्त्रात राज्यकारभार चालविण्यासाठी धन किंवा संपत्तीची प्राप्ती कशी करावी आणि त्याच्या माध्यमातून सामाजिक कल्याणात भर कसा घालावा याचे वर्णन केलेले आहे. एकंदर अर्थशास्त्र विषयाला इ.स. पूर्व काळात विकसित करण्यामध्ये आचार्य चाणक्य यांची भूमिका महत्त्वाची आहे.

Department of Economics
BLD Arts College Pinjar

-----******------

**प्रश्न २. अर्थशास्त्राबाबतचा आधुनिक दृष्टीकोन स्पष्ट करा.**

**उत्तर -** अठराव्या शतकात अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अॅडमस्मिथ यांनी केले. त्यांनी १७७६ मध्ये 'An Enquiry into the Nature and the Causes of the Wealth of Nations' (राष्ट्राची संपत्ती) हा ग्रंथ प्रकाशित केला. तेव्हापासून अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला. म्हणूनच अॅडमस्मिथ यांना अर्थशास्त्राचे जनक म्हटल्या जाते. १७७६ पासून ते आजपर्यंत अर्थशास्त्र विषयाची व्याप्ती व विकास प्रचंड वाढला आहे. अनेक अर्थतज्ज्ञांनी काळानुरुप अर्थशास्त्राच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत. त्यातून अर्थशास्त्राचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

अॅडमस्मिथ यांनी अर्थशास्त्राला संपत्तीचे शास्त्र म्हटले आहे. डॉ. मार्शल यांनी अर्थशास्त्राला संपत्तीच्या माध्यमातून मानवी कल्याण साध्य करणारे शास्त्र म्हटले आहे. प्रा. रॉबिन्स यांनी अर्थशास्त्राला दुर्मिळतेचे शास्त्र संबोधून त्यामध्ये मानवाच्या आर्थिक प्रयत्नांचा अभ्यास होतो असे म्हटले आहे. अलीकडच्या काळात प्रा. जे. के. मेहता यांनी अर्थशास्त्रात मनुष्य जीवनातील दुःख कमीतकमी करुन सुखाची स्थिती प्राप्त करण्यासाठी गरजांचा त्याग करावा असे म्हटले आहे.

-----******------

**प्रश्न ३. अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.**

**उत्तर-** अर्थशास्त्र हे एक शास्त्र आहे. प्रत्येक शास्त्राला काही सीमारेषा किंवा अभ्यास कक्षा असतात. तशाच कक्षा अर्थशास्त्राला सुद्धा आहेत. अर्थशास्त्रामध्ये कोणकोणत्या विषयांचा अभ्यास केला जातो त्यावरुन अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट होते. सामान्यपणे अर्थशास्त्र विषयाची व्याप्ती लक्षात घ्यावयाची असल्यास अर्थशास्त्राचा अभ्यास विषय, अर्थशास्त्राचे स्वरुप आणि अर्थशास्त्राच्या मर्यादा या बाबींचा विचार करावा लागतो.

अ) अर्थशास्त्राचा अभ्यास विषय :

अमर्याद मानवी गरजा आणि पर्यायी उपयोगाची दुर्मिळ साधने यांचा मेळ घालताना मानव जे आर्थिक प्रयत्न करतो त्या आर्थिक प्रयत्नांचा अभ्यास करणे हाच अर्थशास्त्राचा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे.

**ब) अर्थशास्त्राचे स्वरूप :**

अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्याचप्रमाणे एक विज्ञान सुद्धा आहे. अर्थशास्त्र उपभोक्त्यांना महत्तम समाधान कसे मिळवावे या बाबत मार्गदर्शन करते. तसेच उद्योजक तथा व्यावसायिकांनी कमीत कमी खर्चात उत्कृष्ट वस्तू कशी निर्माण करावी आणि महत्तम नफा कसा प्राप्त करावा याबाबत अर्थशास्त्रात ज्ञान मिळते.

**क) अर्थशास्त्राच्या मर्यादा :**

अर्थशास्त्राची व्याप्ती व महत्व दिवसेंदिवस वाढत आहेत. अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र असल्यामुळे याला अनेक मर्यादा सुधा पडतात. कारण अर्थशास्त्र हे परिस्थिती सापेक्ष आहे. हे गृहीतांवर आधारित असून सर्वसामान्य प्रवृत्तीचा अभ्यास करते त्यामुळे याला अनेक मर्यादा निर्माण होतात.

**-----******------**

**प्रश्न ४ - अर्थशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.**

**उत्तर-** अमर्याद मानवी गरजा आणि पर्यायी उपयोगाची दुर्मिळ साधने यांचा मेळ घालताना मानव जे आर्थिक प्रयत्न करतो त्या आर्थिक प्रयत्नांचा अभ्यास करणे हाच अर्थशास्त्राचा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र आपल्या विविध गरजा पूर्ण करण्याकरिता प्रयत्न करीत असतो. अशा प्रयत्नांना आर्थिक प्रयत्न असे म्हणतात. या आर्थिक प्रयत्नांचा अभ्यास अर्थशास्त्र करते. यावरून अर्थशास्त्राचा अभ्यासविषय खालील प्रमाणे सांगता येईल.

**१) मागणी व पुरवठ्याचे विश्लेषण:** आर्थिक विश्लेषण मागणी आणि पुरवठा या दोन बाबींशी निगडीत असते. सर्व आर्थिक प्रश्न हे मागणी आणि पुरवठा या भोवती केंद्रित असतात. हा अर्थशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे.

**२) उत्पादन विश्लेषण:** उद्योजकांच्या दृष्टिकोनातून उत्पादनासंबंधीचे विश्लेषण अर्थशास्त्रात केले जाते. यामध्ये उत्पादनाचे विविध घटक, उत्पादन व्यय व प्राप्ती, उत्पत्तीचे नियम, बदलत्या प्रमाणाचा नियम इत्यादीचा समावेश होतो.

**३) किंमत विश्लेषण :** अर्थशास्त्रातील महत्त्वाचा अभ्यास विषय म्हणजे किंमत विश्लेषण, अर्थव्यवस्थेतील आर्थिक क्रियांचे समायोजन घडवून आणणारी महत्त्वाची यंत्रणा म्हणजे किंमत यंत्रणा होय. बाजारात

वाढत जाणाऱ्या किमती ह्या उत्पादकांच्या दृष्टीने ग्रीन सिग्नल असतात ज्या उत्पादन वाढविण्याची प्रेरणा देतात तर दुसऱ्या बाजूने वाढत जाणाऱ्या किमती ग्राहकांना सतर्क करतात.

**४) नफा विश्लेषण:** कमीतकमी खर्चामध्ये अधिकाधिक उत्पादन करुन नफा मिळविणे हे उत्पादन संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असते. नफा हा वस्तूची किंमत, उत्पादन खर्च, प्रभावी मागणी, व्यवसायातील जोखीम, अनिश्चितता आणि नवप्रवर्तन यावर अवलंबून असतो. या सर्व घटकांचे विश्लेषण अर्थशास्त्रात करण्यात येते.

**५) भांडवल-गुंतवणूक विश्लेषण:** देशाच्या आर्थिक विकासात भांडवल निर्मिती व त्याच्या गुंतवणुकीला महत्त्वाचे स्थान आहे. भांडवलाच्या उपलब्धतेवरच उद्योग, व्यवसायाचा विकास अवलंबून असतो. देशातील एकूण मागणी, एकूण रोजगार, एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे गुंतवणुकीवर अवलंबून असते. या दोन्ही महत्त्वाच्या घटकांचे विश्लेषण अर्थशास्त्रात करण्यात येते.

**६) सार्वजनिक आय-व्यय विश्लेषण:** सरकारच्या आय व व्ययाच्या अभ्यास अर्थशास्त्रात होतो. योग्य आयव्ययावरच सरकारचे यश व अपयश अवलंबून असते. त्या दृष्टीने अर्थशास्त्रात सरकारला विविध मार्गातून मिळणारे उत्पन्न तसेच सरकारला विविध सामाजिक कार्यावर करावा लागणारा खर्च याचे विश्लेषण करण्यात येते.

**७) कृषी उद्योग व सेवांचे विश्लेषण:** देशाचा संतुलित विकास कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो. त्या दृष्टीने अर्थशास्त्रात या तिन्ही क्षेत्राच्या विकासाचा अभ्यास करण्यात येतो.

**८) व्यापारचक्र विश्लेषण :** मुक्त व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य व्यापारचक्र. देशात तेजी व मंदीची अवस्था निर्माण होणे म्हणजे व्यापारचक्र होय. वस्तूच्या मागणी व पुरवठ्यामध्ये झालेल्या असंतुलनातून व्यापारचक्राची निर्मिती होते. या व्यापारचक्राचा परिणाम उद्योग व व्यवसायावर होत असतो.

इत्यादी महत्वाच्या पातळीवर अर्थशास्त्र महत्वपूर्ण ठरते. अर्थशास्त्र हे सर्वोच्च विज्ञान आहे. त्याचा मानवाच्या कल्याणासाठी उपयोग होतो.

Department of Economics BLD Arts College Pinjar

**-----******------**

**प्रश्न ५ - अर्थशास्त्राचे स्वरुप सविस्तर लिहा.**

**उत्तर-** अर्थशास्त्र व्यक्ती तथा संस्थांच्या आर्थीक समस्यांचे अध्ययन करते. यासाठी काही आर्थिक नियमांची बांधणी करण्यात आली आहे. त्यामाध्यमातून अर्थशास्त्राचे स्वरूप स्पष्ट होते. अर्थशास्त्राचे स्वरुप विज्ञान व कला या दोन्ही स्वरुपात दिसून येते हे पुढील प्रमाणे दिसून येते.

**१ ) अर्थशास्त्र एक विज्ञानाच्या स्वरुपात:**

कोणत्याही विषयाच्या निरीक्षणातून, अनुभवातून, प्रयोगातून मांडण्यात येणाऱ्या सुबद्ध ज्ञानाला विज्ञान असे म्हणतात. विज्ञानामध्ये मांडण्यात आलेल्या नियमांची सत्यता प्रयोगाद्वारे पडताळून पाहता येते. त्यादृष्टीने अर्थशास्त्र विषयाचा विचार केल्यास ते एक विज्ञानाच्या स्वरुपात दिसून येते. कारण अर्थशास्त्रात मांडण्यात आलेले आर्थिक नियम निरीक्षणातून, अनुभवातून, प्रयोगातून मांडण्यात आलेले असतात. शिवाय या नियमाची सत्यता समाजात पडताळून पाहता येते. कारण संपूर्ण समाज हीच अर्थशास्त्राची प्रयोगशाळा असते.

**२) अर्थशाख एक कलेच्या स्वरुपात:**

सामान्यपणे 'कोणतेही काम कमीत-कमी वेळेत, कमीत-कमी श्रमात व कमीत-कमी खर्चामध्ये सर्वोत्तम पध्दतीने करणे म्हणजे कला होय.' दुसऱ्या शब्दात 'निश्चित उद्दिष्ट, नियोजित वेळेत, साध्य करण्याकरिता ज्ञानाचा व्यावहारिक दृष्टीने उपयोग करुन घेण्याच्या पद्धतीला कला असे म्हणतता.'

अर्थशास्त्र एक कला आहे. अर्थशास्त्र हे उपभोक्त्यांना आपल्या मर्यादित उत्पन्नातून महत्तम समाधान कसे प्राप्त करावे याची कला शिकविते. उद्योजक व व्यावसायिकांना कमीत कमी खर्चामध्ये, अधिकाधिक व उकृष्ट दर्जाचे उत्पादन कसे करावे व नफा कसा मिळवावा याची कला शिकविते. कोणत्या वस्तूचे, कोणत्या ठिकाणी, कोणत्या पध्दतीने, किती प्रमाणात उत्पादन करावे, वस्तूची किंमत किती ठेवावा? अचूक भविष्यकालीन अंदाज कसे करावेत, उत्पादन घटकांना योग्य मोबदला कसा द्यावा, महत्तम नफ्याचे उद्दिष्ट कसे साध्य करावे याविषयी अर्थशास्त्र मार्गदर्शन करीत असते.

वरील विवेचनावरुन स्पष्ट होते की, अर्थशास्त्रात आर्थिक सिद्धांताची मांडणी सुबद्ध ज्ञानाच्या स्वरुपात झालेली आहे. त्यामुळे ते एक विज्ञान आहे.

**-----*****-----**

**प्रश्न ६ – अर्थशास्त्राच्या मर्यादा स्पष्ट करा.**

**उत्तर -** अर्थशास्त्राचे महत्व आणि व्याप्ती खूप जास्त आहे आणि ती सतत वाढतच आहे. तरीसुद्धा ते एक शास्त्र असल्यामुळे आणि त्याची प्रयोगशाळा समाज असल्यामुळे अर्थशास्त्राच्या अभ्यासाला मर्यादा पडतात. त्या खालील प्रमाणे सांगता येतील.

Department of Economics
BLD Arts College Pinjar

१) आर्थिक व्यवहारच अभ्यासले जातात. – अर्थशास्त्रात केवळ मानवाचे आर्थिक व्यवहार अभ्यासले जातात. अनार्थिक व्यवहार अभ्यासता येत नाहीत हि पहिली मर्यादा होय.

२) परिस्थिती सापेक्ष – अर्थशास्त्रात अभ्यासले जाणारे नियम हे विशिष्ट परिस्थितीतच तपासता येतात. ते स्थळ काळ परिस्थिती परत्वे बदलत असतात.

३) अनिश्चित स्वरुप - आर्थिक नियम भौतिकशास्त्रातील नियमांच्या तुलनेत अनिश्चित स्वरुपाचे असतात. कारण आर्थिक नियम मन, बुद्धी व भावना असलेल्या सजीव मानवाच्या आर्थिक वर्तणुकीशी संबंधित असतात.

४) गृहितांवर आधारित - आर्थिक नियम हे गृहितांवर आधारित असतात. विशिष्ठ गृहीत परिस्थितीमध्येच ते खरे ठरणारे असतात. गृहित परिस्थिती बदलली की आर्थिक नियमही बदलतात.

५) सर्वसामान्य प्रवृत्तीदर्शक - आर्थिक नियम हे समाजातील मानवाची सर्वसामान्य प्रवृत्ती दर्शविणारे असतात. आर्थिक व्यवहार करताना मनुष्य कसा वागतो, यासंबंधीची मानवांची सर्वसामान्य प्रवृत्ती विचारात घेतली जाते.

वरील प्रमाणे अर्थशास्त्राच्या मर्यादा लक्षात येतात.

**-----*****-----**

**प्रश्न ७ - सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या देवून महत्व सविस्तर लिहा.**

**उत्तर-** अर्थशास्त्राचे प्रामुख्याने दोन प्रकार मानले जातात. ते म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र होय. सूक्ष्म ला इंग्रजीत 'Micro' असे म्हणतात. या शब्दाची व्युत्पत्ती 'Mikros' या ग्रीक शब्दापासुन झालेली असून त्याचा अर्थ लहान किंवा सूक्ष्म असा होतो. सूक्ष्म अर्थशास्त्राला अंशलक्षी, व्यष्टी, अणु अर्थशास्त्र इत्यादी पर्यायी नावांनीही संबोधिले जाते.

**सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्याः**

के.ई. बोल्डींगच्या मते, **'विशिष्ट अशा पेढ्या, विशिष्ट कुटुंब, विशिष्ट, वस्तूंच्या किंमती, मजूरी, उत्पन्न तसेच विशिष्ट उद्योग आणि विशिष्ट प्रकारच्या वस्तूंचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय.'**

सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट पेढीचे संतुलन, विशिष्ट उद्योगाचे संतुलन, एका विशिष्ट श्रमिकाची मजुरी कशी ठरते, एका विशिष्ट वस्तूची किंमत कशी ठरते याचे अध्ययन केले जाते. याशिवाय मागणी, पुरवठा, उत्पादनाचे घटक व त्यांची किंमत निश्चिती, उत्पन्न, उत्पादन, उपभोग, इत्यादींचे विवेचन केले जाते.

**सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्वः**

**१. सरळ व सोपे विवेचन:** सूक्ष्म अर्थशास्त्रात एका विशिष्ट घटकाचे विवेचन केले जाते. त्यामुळे विवेचनातील गुंतागुंत नाहीशी होऊन विवेचन सरळ व सोपे बनवते.

**२. अचूक अंदाज बांधता येतो:** सूक्ष्म अर्थशास्त्रात एका घटकाचे अध्ययन करुन त्यावरुन काढलेले निष्कर्ष इतर तत्सम घटकांना लावले जातात. यालाच शीतावरुन भाताची परीक्षा करणे म्हणतात. अंदाज बांधणे म्हणजे भविष्य वर्तविणे नाही तर काही अटींवर भविष्य वर्तविणे होय.

**३. मूक्त अर्थव्यवस्थेची कार्यपध्दती कळण्याला साहाय्यक :** मूक्त अर्थव्यवस्थेची कार्यपध्दती कशी चालते हे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून लक्षात येते.

**४. सरकारी आर्थिक समिक्षेसाठी उपयुक्त:** नीतिच्या सरकारने स्वीकारलेल्या आर्थिक नीतिच्या समिक्षेसाठी सूक्ष्म अर्थशास्त्र किंमत यंत्रणेसारख्या सैध्दांतिक साधनांचा वापर करते.

**५. उत्पादन घटकांच्या वापराला साहाय्यक:** कार्यक्षम उत्पादन घटकांचा काटकसरीने व सर्वात फायदेशीर वापर कसा करावा यादृष्टीने सूक्ष्म अर्थशास्त्र मार्गदर्शन करीत असते.

**६. उत्पादक व व्यावसायिकांना उपयुक्त:** मर्यादित साधनांद्वारे कमितकमी खर्चात जास्तीतजास्त उत्पादन कसे करावे, उपभोक्त्यांची मागणी किती आहे, उत्पादनव्यय किती येतो इत्यादीसंबंधी माहिती उत्पादक व व्यावसायिकांना सूक्ष्म अर्थशास्त्र पुरविते.

**७. उपभोक्त्यांना उपयुक्त -** मर्यादित उत्पन्नातून महत्तम समाधानाची प्राप्ती कशी करावी यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्रातील आहृ्हासी सीमांत उपयोगिता नियम, सम सीमांत उपयोगिता नियम उपभोक्त्याला मार्गदर्शन करीत असतात.

**८. करविषयक समस्या कळण्याला उपयुक्त:** करांमुळे समाजकल्याणावर नेमका कसा व किती परिणाम होतो हे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासावरुन लक्षात येते. करभाराचे वाटप उपभोक्ते व उत्पादक वर्गात कसे होते यासंबंधी माहितीसुध्दा सूक्ष्म अर्थशास्त्रांच्या साहाय्यानेच प्राप्त होते.

Department of Economics BLD Arts College Pinjar

**९. आंतरराष्ट्रीय व्यापाराला साहाय्यक:** आंतरराष्ट्रीय व्यापाराच्याअटी व लाभ कशा निश्चित होतात, चलनाचा विनिमय दर कसा ठरतो इत्यादी प्रश्नांची उत्तरे सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे प्राप्त होतात. अशाप्रकारे सूक्ष्म अर्थशास्त्र हे आंतरराष्ट्रीय व्यापाराला साहाय्यक ठरते.

**१०. नियोजनाला आधार:** आर्थिक विकासासाठी नियोजन करताना सूक्ष्म अर्थशास्त्र सैध्दांतिक व व्यावहारिक स्वरुपात महत्त्वपूर्ण साहाय्य करीत असते.

**-----*****-----**

**प्रश्न ८ - स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या देवून महत्व सविस्तर लिहा.**

**उत्तर-** स्थूल अर्थशास्त्रालाच समष्टी अर्थशास्त्र, समग्रलक्षी अर्थशास्त्र, सामान्य अर्थशास्त्र, बृहत अर्थशास्त्र, समूह अर्थशास्त्र, सर्वलक्षी अर्थशास्त्र, इत्यादी पर्यायी नावानेही संबोधले जाते. स्थूल अर्थशास्त्राला इंग्रजीत Macro Economics असे म्हणतात. यातील Macro हा शब्द ग्रीकभाषेतील Makros शब्दापासून आलेला आहे. याचा अर्थ मोठा, स्थूल किंवा समग्र असा होतो. म्हणून स्थूल अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेच्या एका विशिष्ट घटकाचा अभ्यास केला जात नसून संपूर्ण समूहाचा अभ्यास केला जातो. उदा. राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार, एकूण मागणी, एकूण, गुंतवणूक, एकूण बचत, इत्यादींचा अभ्यास केला जातो.

१९२९-३० च्या जागतिक महामंदीपर्यंत संपूर्ण जगात सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व कायम होते. परंतु जागतिक महामंदीमुळे निर्माण झालेल्या समस्या सूक्ष्म अर्थशास्त्र सोडवू शकले नाही. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व कमी होत जावून स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व वाढत गेले. यादरम्यान प्रसिध्द अर्थतज्ञ लॉर्ड केन्स यांनी १९३६ मध्ये 'General Theory of Employment, Interest and Money' लिहिलेल्या ग्रंथाने आमुलाग्र असा आर्थिक बदल घडवून आणला. या ग्रंथात त्यांनी आर्थिक समस्या सोडविण्याची स्थूल किंवा समष्टी पध्दतीचे विश्लेषण केले.

**स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या -**

प्रो. के. ई. बोल्डिंग यांच्या मते, **"स्थूल अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी शाखा होय की, ज्यामध्ये विशिष्ट घटकांचा अभ्यास होत नसून त्या घटकांच्या समूहाचा व सरासरीचा अभ्यास होत असतो. तसेच त्या समूहाची व्याख्या करून त्यातील परस्पर संबंध तपासले जातात."**

**स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व (Importance of Macro Economics)**

**१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यासः** स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या एका विशिष्ट घटकाचा अभ्यास करीत नसून संपूर्ण समूहाचा अभ्यास करते. त्यामुळे स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येते.

**२) सरकारच्यादृष्टीने महत्त्वः** सरकारला आपले ध्येय-धोरण ठरविताना केवळ एक घटकाचा अभ्यास करून चालत नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करावा लागतो. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अंदाजपत्रक नीती राबविताना, आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण राबविताना, कृषी, उद्योग व सेवाक्षेत्राचा विकासासाठी धोरण ठरविताना सरकारला स्थूल अर्थशास्त्र मार्गदर्शक ठरते.

**३) नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वः** देशाचा सर्वांगिण व समतोल विकास साध्य करण्याकरिता नियोजनाची नितांत आवश्यकता असते. भारतसरकारने नियोजन आयोगाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजना राबवून भारताचा सर्वांगिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा या नियोजनाकरिता नियोजनकारांना संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करावा लागतो. त्यादृष्टीने स्थूल अर्थशास्त्र त्यांना मार्गदर्शन करते.

**४) गतिमान अर्थव्यवस्थेचे आकलनः** अर्थव्यवस्था गतिमान असेल तरच देशाचा विकास होत असतो. गतिमान अर्थव्यवस्थेत उत्पन्न, उत्पादन व रोजगारात सतत वाढ होत असते. या गतिमान अर्थव्यवस्थेचे आकलन स्थूल अर्थशास्त्रावरून होते. अर्थव्यवस्थेला गतिमान करणारे घटक व त्या घटकाची कार्यपध्दती समजून घेण्याकरिता स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**५) व्यापारचक्रावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्व:** भांडवलशाही व मुक्तदृष्टीने महत्त्व : भांडवलशाही व मुक्त अर्थव्यवस्थेत तेजी मंदीची व्यापारचक्रे सतत सुरू असतात. तेजीमध्ये वस्तूच्या किंमती सतत वाढत असतात तर मंदीमध्ये त्या सतत कमी होत असतात. अशावेळी स्थैर्यासह देशाचा संतुलित विकास साध्य करण्याकरिता या व्यापारचक्रांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. त्यादृष्टीने व्यापारचक्राचे स्वरूप, व्यापारचक्र निर्माण होण्याची कारणे, त्याचे परिणाम जाणून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याकरिता स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**६) समाजवादी अर्थव्यवस्थेचा दृष्टीने महत्त्वः** समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकार एका व्यक्तिचा किंवा एका विशिष्ट घटकाचा विचार करीत नसून संपूर्ण समाजाचा किंवा समूहाचा विचार करीत असते. त्यामुळे समाजवादी अर्थव्यवस्थेच्यादृष्टीने समूहाचा अभ्यास करणाऱ्या स्थूलअर्थशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**७) मुद्रामुल्यातील बदलाचे आकलनः** अर्थव्यवस्थेतील मुद्रेचे परिणाम वाढले असता किंमतपातळी वाढते व किंमतपातळी वाढल्याने मुद्रेचे मूल्य कमी होते. याउलट मुद्रेचे परिमाण कमी झाले असता किंमतपातळी कमी होते व किंमतपातळी कमी झाल्याने मुद्रेचे मूल्य वाढते. अशाप्रकारे अर्थव्यवस्थेतील मुद्रापरिमाणातील बदलाचे किंमतपातळी व मुद्रामूल्यावर होणाऱ्या परिणामाचे आकलन स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाने होते.

**८) आर्थिक विकासाचे अध्ययनः** अविकसित व विकसनशील देशांना आपला विकास साध्य करण्याकरिता तसेच विकसित देशांना आपला विकास टिकवून ठेवण्याकरिता व त्यामध्ये वृध्दी करण्याकरिता स्थूल अर्थशास्त्राची मदत घ्यावी लागते.

**९) आर्थिक प्रश्नांची सोडवणूकः** स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाने देशासमोरील बेकारी, दारिद्र्य, आर्थिक अस्थिरता, आर्थिक विषमता, वित्तीय तूट, प्रतिकूल शोधनशेष, वाढती लोकसंख्या, कर्जबाजारीपणा, पर्यावरण प्रदूषण, व्यापारचक्र इत्यादी आर्थिक समस्यांची जाणीव होते व ह्या समस्या सोडविण्याचे मार्गदर्शन मिळते.

**१०) आर्थिक सिध्दांताची निर्मितीः** स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाने अनेक महत्त्वाच्या आर्थिक सिध्दातांची निर्मिती झाली आहे. उदा. आर्थिक विकासाचे सिध्दांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत, रोजगारविषयक सिध्दांत, उपभोगप्रवृत्तीविषयक सिध्दांत, गुंतवणूकीसंदर्भात सिध्दांत, मुद्रामुल्यातीलबदलासंदर्भात सिध्दांत इत्यादी.

**११) सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाला साहाय्यकः** सूक्ष्म अर्थशास्त्राचे विवेचन करताना स्थूल अर्थशास्त्राचे सहाय्य घ्यावे लागते. सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र हे पूर्णपणे स्वतंत्र नसून ते एकमेकास पूरक आहेत. सूक्ष्म अर्थशास्त्राचे सिध्दांत मांडताना स्थूल अर्थशास्त्राची मदत घ्यावी लागते.

**१२) राजकीय पक्षांना महत्त्वपूर्ण:** निवडणुकीपूर्वी प्रत्येक राजकीय पक्ष आपला जाहिरनामा प्रसिद्ध करतात. त्यावेळी ते स्थूल अर्थशास्त्रातील समस्या कशा सोडवू यासंबंधी माहिती देतात. जसे गरीबी हटाव, सबका साथ सबका विकास, रोजगारवृद्धी, ग्रामीण विकास, इत्यादी.

अश्याप्रकारे स्थूल अर्थशास्त्राचे महत्व वरील विविध मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**-----*****-----**

Department of Economics
BLD Arts College Pinjar